| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४] | ओम विद्यालंकार संस्था. | अस्मिता महिला महाविद्यालय, मुंबई. | कला १९९२-९३ | १९९५-९६ [एका तुकडीस] |
| ५] | वैदर्भिय महिला संस्था, नागपूर. | विमेन्स कॉलेज, ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, नागपूर. | कला वाणिज्य [हिंदी माध्यम] १९८९-९० | १९९२-९३ [एका तुकडीस] |
| ६] | कृषि विकास प्रतिष्ठान. | शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, मालेगांव, ता. बारामती, जिल्हा पुणे. | वाणिज्य १९९१-९२ | १९९४-९५ [एका तुकडीस] |

रयत शिक्षण संस्थेचे महिला महाविद्यालय, सातारा या महाविद्यालयातील वाणिज्य शाखेस या संचालनालयाचे आदेश क्रमांक एनजीसी/१९९५/६४९५/विद्याशाखा/मवि-१, दिनांक २३.२.९६ अन्वये सन १९९५-९६ पासून १००% मंजूर करण्यात आलेले अनुदानाचे आदेश रद्द करण्यात येत आहे.

वैदर्भिय महिला संस्था, नागपूरचे विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, नागपूर या महाविद्यालयातील वाणिज्य [हिंदी माध्यम] शाखेस या संचालनालयाचे आदेश क्रमांक एनजीसी-१९९१/विद्याशाखा/९अ, दिनांक ५.९.९४ अन्वये सन १९९२-९३ मध्ये २५% अनुदान मंजूर केलेले आहे. यापूर्वी टक्केवारीनुसार दिलेल्या अनुदानाचे समायोजन करण्यात यावे.

वरील महाविद्यालयांना ज्या वर्षी १००% अनुदान मंजूर केले आहे त्यापुढील वर्षापासून वेतनेतर अनुदान देय होईल.

अनुदान मंजूर केलेल्या महाविद्यालयाचे अनुदान निर्धारण करताना ज्या वर्षी शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२७१/१५७७९६/२५, दिनांक ३.१०.१९७१ प्रमाणे विद्याशाखानिहाय विद्यार्थी संख्येची अट पूर्ण करीत नसेल त्या संबंधित वर्षाचे अनुदान निर्धारण करताना जेवढे विद्यार्थी कमी असतील तेवढ्या विद्यार्थ्यांची विहित दरानुसार शैक्षणिक शुल्काची रक्कम अनुदानातून वजा करावी.